**सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – संदीप आनंद कामत,

वय – ४३ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणुक – सी.आय.डी. ता. सातारा, जि. सातारा.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एन. आनसरवाडेकर यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक १६/०९/२०२२ रोजी मी औराद श्हाजानी पोलिस स्टेशन मध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. दिनांक १६/०९/२०२२ रोजी औराद शहाजानी येथील ग्रामीन रुग्नालयाचे वैद्यकीय अधिकारी वैभव लक्ष्मण कांबळे यांनी तक्रार दिली होती. त्या तक्रारी प्रमाणे गुन्हा रजिस्टर नंबर १९५/२०२२ हा गुन्हा भा.द.वि. कलम ४२०,४१९,१७५,१७९, मेडीकल प्रॅक्टीशनर अॅक्ट कलम ३३–अ, मेडीकल कॉन्सलींग अॅक्ट कलम १५ करीता नोंद होता. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे होता. फिर्याद सोबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी जप्त केलेल्या मुद्देमालाची यादी व जप्ती पंचनामा होता.

२. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी घटनास्थळावर जावून दोन पंचांच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. (आता मला प्रस्तुत कामातील निशाणी २१ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) तो पंचनामा मी केलेला आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच दोन पंचांच्या सहया आहेत. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे.

३. साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. आरोपीविरुध्द पुरावा तपासामध्ये मिळुन आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. रेड वेळी त्याच्याकडे वैद्यकीय व्यवसायाचा कोणताही परवाना दिसून आला नाही तसेच त्यावेळी त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही.

तपासामध्ये आरोपी कडे वैद्यकीय व्यवसायाचा परवाना नसताना दोन वर्षापासून परीसरामध्ये तो डॉक्टर असल्याचे भासवून लोकांच्यावर उपचार करत होता असे निष्पन्न झाले होते. आरोपी यांना मी ओळखतो. आरोपी न्यायालयामध्ये हजर नाही.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड.एच.व्ही. आलमले यांच्या मार्फत शपथेवर सुरु –**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी गुन्हयासंदर्भाने चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष गुन्हयाची चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेला मुद्देमाल माझ्याकडे दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी ओळखींच्या पंचाकडून केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांच्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदवलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दोषारोपपत्र तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडे खोटी रेड टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.01.22 15:42:59 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२२/०१/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा